# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3854
दिनांक : 16 AUG 2017

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत पद्वेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावर रिर्पोटिंग न झाल्याने एक अंतिम संधी देणेबाबत...

संदर्भ:- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/३८२७ दि. ०९.०८.२०१७.

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकाचा अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीपर्यंत अलॉट झालेले प्रवेश अद्यापपर्यंत काही विनाअनुदानीत संस्थांनी संस्थास्तरावर रिर्पोटिंग केले नसल्याने सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश कर्न्फम करण्यासंदर्भात विनंती पत्र या संचालनालयास प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) जाऊनही प्रत्यक्ष संस्थेत जाऊन निश्चित करू शकले नाहीत.किंवा एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे विद्यार्थी हे केंद्रिभूत पद्वेश प्रक्रियेतील असल्याने सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावर रिर्पोटिंग करणेबाबत एक अंतिम संधी म्हणुन संबंधित संस्थेने संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे दि. १८.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ पर्यंत प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर कालावधीत विभागीय कार्यालयानी (रविवार सुट्टीत विभागीय कार्यालय चालु ठेवुन) खाली नमुद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करुन संस्थास्तरावरील रिर्पोटिंग करुन घेण्यासाठी या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे. सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयानी सदर प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक पार पाडावी.

- केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील अंतिम (Latest) अलॉटमेंटनुसार (Seat Type उपलब्ध असल्यास) त्याच विनाअनुदानित संस्थेत विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास, विद्यार्थ्यांचा त्याच विनाअनुदानित संस्थेत प्रवेश घेण्यास इच्छुक असल्याचा मुळ अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संस्थास्तरावर रिर्पोटिंग करुन घेण्यात यावे.

- तसेच वरीलपैकी ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे संस्थेमार्फत प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख आकारुन आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्यांच्या Excel मधील इत्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेकडे विभागीय कार्यालय पाठवतील व त्यांची योग्य ती नोंद संबंधित सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयानी ठेवावी.

- सदर प्रवेश over and above होणार नाही. यांची दक्षता संबंधित सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयानी घ्यावी.

- अशा प्रकारचे केलेले प्रवेश क्रेंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील.

* अशा प्रकारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत विनाअनुदानित संस्थेत अलॉटमेंट झालेल्या उमेदवाराचे प्रवेश निश्चित करण्यासाठी एक अंतिम संधी म्हणुन दि. १८.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ पर्यंत देण्यात आली असल्याने सदर संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास विद्यार्थी/पालक व संस्था यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

तसेच वर नमुद बाब वगळुन येथे असे ही कळविण्यात येते की, या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/ ३८३० दि. १०.०८.२०१७ मधील मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमुद केल्यानुसार विद्यार्थी जर पहिल्या अलॉटमेंट झालेल्या विनाअनुदानित संस्थेत जाऊन तेथे Seat Type उपलब्ध असल्यास संस्थेने विद्यार्थ्यास सदर रिक्त जागेवर प्रवेश दिला असुन त्याप्रमाणे Admission Portal मधुन संस्थेच्या Login मधून मेसेज करुन मेसेज बॉक्सव्दारे संचालनालयास Admin यांना मेसेज केला आहे परंतु अद्यापपर्यंत अशा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश या संचालनालयाकडुन कन्फम करण्यात आले नाहीत अशा विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती Excel मध्ये (विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या कागदपत्राच्या झेराक्स प्रतीसह) संबंधित संस्थेने विभागीय कार्यालयामार्फत hardcopy व ईमेलव्दारे या संचालनालयास दि. २२.०८.२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावी. जेणेकरुन प्रस्तुत प्रकरणात पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत: मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रतिलिपी: १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना. प्रस्तुत प्रकरणात कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांची Excel मधील इत्यंभूत माहितीची यादी या संचालनालयास सुध्दा सादर करण्यात यावी.

३. संबंधित प्राचार्य, सर्व विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी संस्थांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१७/ ३८२५
दिनांक : 9 AUG 2017

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे संस्थेकडे रिपोर्टिंग करण्यासाठी दिनांक ११.०८.२०१७ रोजी अतिरिक्त संधी देणेबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या पदविका अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीपर्यंत अलॉट झालेले प्रवेश संबंधित विद्यार्थ्याने काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) जाऊनही प्रत्यक्ष संस्थेत जाऊन निश्चित करू शकले नाहीत किंवा एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा उमेदवारांनी त्यांना मिळालेल्या संस्थेत प्रवेश निश्चितीची संधी देण्यासंदर्भात असे अर्ज संचालनालयास प्राप्त होत आहेत. अशा उमेदवारांना प्रवेश ॲलॉट झालेल्या संस्थेत संबंधित Allot झालेल्या seat type ची जागा रिक्त असेल आणि सदर संस्थेने ती अद्यापर्यंत रिक्त ठेवली असेल तर उमेदवाराला त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करून त्यास प्रवेशाची संधी मिळेल या दृष्टीकोनातून अशा प्रवेशाला मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या/दुस-या किंवा तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत ॲलॉट झालेल्या प्रवेशाबाबत एआरसी मध्ये विहीत केलेले शुल्क ॲक्सेप्टन्स भरूनही त्यांच्या अंतिम Allotment Institute Status नुसार प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेने उमेदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित केले तर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.

२. ज्या उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या/दुस-या किंवा तिस-या प्रवेश फेरीनंतर त्यांच्या अंतिम Allotment Institute Status नुसार संस्थेत ॲलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले शुल्क ॲक्सेप्टन्स भरलेले आहे किंवा भरलेले नाही आणि एआरसी मध्ये जाऊन कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया पूर्णही केलेली नाही असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेने उमेदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित कले तर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.

३. मात्र असे करताना संस्थेने Admission Portal मधुन संस्थेच्या Login मधून मेसेज करुन मेसेज बॉक्सव्दारे संचालनालयास Admin यांना मेसेज करुन त्यांच्या संस्थेत उपस्थित झालेल्या उमेदवाराची Seat Type available असल्याचे व संस्था संबंधित उमेदवारास प्रवेश देण्यास तयार असल्याचा मेसेज पाठवल्यावर या उमेदवाराचा प्रवेश निश्चित करण्यासाठी मान्यता देण्याची कार्यवाही झाल्यानंतर असा प्रवेश Confirm करता येईल.

४. तसेच वरीलपैकी ज्या उमेदवारांनी एआरसी मध्ये जाऊन कागदपत्र पडताळणी न करताच सीट ॲक्सेप्टन्स शुल्क न भरता थेट संस्थेत उपस्थित झाले असतील अशा उमेदवारांकडुन रुपये १०००/- रोख आकारुन आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे विद्यार्थ्यांच्या यादीसह त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) पाठवतील.

५. अशा प्रकराचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील.

६. अशा प्रकारे थेट संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी अंतिम संधी म्हणजे दि. ११.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल. विद्यार्थी व पालकांनी ही संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास त्यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

(डॉ सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:** मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर
**प्रतिलिपी:** १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
३. संबंधित प्राचार्य, सर्व पदविका अभियांत्रिकी संस्था यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3830

दिनांक : 10 AUG 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील प्रथम फेरीतील सुधारित अलॉटमेंटमधील प्रवेशाबाबत...**

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रथम फेरीची अलॉटमेंट केली होती. परंतु, प्रथम फेरीचे अलॉटमेंट तांत्रिकी कारणास्तव चुकीची असल्याने प्रथम फेरीची सुधारित अलॉटमेंट करण्यात आली. त्याप्रमाणे या संचालनालयाने सुधारित अलॉटमेंट करण्यात आल्याचे SMS व्दारे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात आले होते. तसेच याबाबत विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी या संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीही करण्यात आली होती. प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे उमेदवारांनी भरलेल्या ऑप्शन व गुणवत्तेनुसार बऱ्याच उमेदवारांचे प्रथम फेरीमध्ये झालेले अलॉटमेंट बदलल्याने त्यांना betterment नुसार ऑप्शन अलॉट झाले. परंतु, काही उमेदवारांनी प्रथम फेरीतील अलॉटमेंट फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केले होते व त्यांनी त्याच संस्थेत प्रवेश कन्फम करुन प्रवेश देण्यासंदर्भात विनंती अर्ज या संचालनालयास प्राप्त झाले आहेत. तरी, खालील नमुद अशा उमेदवाराबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यास या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे.

1. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये शासकीय तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी शासकीय तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार तिसऱ्या फेरीपर्यंत betterment मिळालेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमाचे ऑप्शन भरण्यात यावे.

2. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये शासकीय तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी शासकीय तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले, अशा विद्यार्थ्यांनी विनाअनुदानित संस्थेत दि. 11.08.2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत रिपोर्टिंग करुन प्रवेश करणे व इच्छा असल्यास शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमांचे ऑप्शन भरण्यात यावे.

3. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी विनाअनुदानित तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार दुसऱ्या विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले, अशा विद्यार्थ्यांनी इच्छा असल्यास पहिल्या विनाअनुदानित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेने उमेदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित केले तर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.

अन्यथा प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमध्ये अलॉट झालेल्या विनाअनुदानित तंत्रनिकेतनात दि. 11.08.2017 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्रवेश घेण्यात यावा. तसेच इच्छा असल्यास शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमाचे ऑप्शन भरण्यात यावे.

**अनुक्रमांक 2 व 3 बाबत** विनाअनुदानित तंत्रनिकेतनाने कार्यवाही करताना Admission Portal मधुन संस्थेच्या Login मधून मेसेज करुन मेसेज बॉक्सव्दारे-संचालनालयास Admin यांना मेसेज करुन त्यांच्या संस्थेत उपस्थित झालेल्या उमेदवाराची Seat Type available असल्याचे व संस्था संबंधित उमेदवारास प्रवेश देण्यास तयार असल्याचा मेसेज पाठवल्यावर या उमेदवाराचा प्रवेश निश्चित करण्यासाठी मान्यता देण्याची कार्यवाही झाल्यानंतर असा प्रवेश Confirm करता येईल. अशा प्रकारचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील. अशा प्रकारे थेट संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी अंतिम संधी म्हणजे दि. 11.08.2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असेल. विद्यार्थी व पालकांनी ही संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास त्यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

**(डॉ. सुभाष महाजन)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:** मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर
**प्रतिलिपी:** 1. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर तसेच यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
3. संबंधित प्राचार्य, सर्व पदविका अभियांत्रिकी संस्था